# महाराष्ट्र शासन

राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई (SIAC)

(प्री.आय.ए.एस.ट्रेनिंग सेंटर)

हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस समोर, मुंबई ४०० ००१

दूरध्वनी क्रमांक ०२२-२२०७०९४२ Web : www.siac.org.in ई-मेल : siac१९१५@gmail.com


---

जा.क्र.एसआयएसी/२०२५/सूचना/४८४ दिनांक-२७/१०/२०२५

## सुचना- तिसरी प्रवेश यादी रद्द करणेबाबत

सन २०२५-२६ करीता उच्च शिक्षण विभागांतर्गत सहा प्रशिक्षण केंद्रे तसेच महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागातील प्रशिक्षण केंद्रासाठी दिनांक २७.०७.२०२५ रोजी एकत्रित सामाईक प्रवेश परीक्षा पार पडली असून सदर परीक्षेचा अंतिम निकाल दि.२२.०९.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी भरलेल्या पसंतीक्रमानुसार सूचना क्र.एसआयएसी/२०२५/सुचना/४८० दि.२४.१०.२०२५ अन्वये तिसरी प्रवेश यादी दि.२४.१०.२०२५ रोजी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. सूचना क्र. एसआयएसी/२०२५/सुचना/४६६ दि.१४.१०.२०२५ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या दुस-या प्रवेश फेरीतील विद्यार्थ्यांना Betterment form भरण्याची संधी देण्यात आली नव्हती. त्यामुळे २ ऱ्या फेरीत प्रवेश नाकारलेले गुणवत्ताधारक विद्यार्थी जास्त गुण असूनसुध्दा तांत्रिक कारणास्तव तिसऱ्या यादीबाहेर राहीले होते. तथापि अशा विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या सूचना/तक्रारी यांचा विचार करून दि.२४.१०.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली तिसरी प्रवेश यादी तांत्रिक कारणास्तव रद्द करण्यात येत आहे.

तसेच दुसऱ्या प्रवेश यादीतील प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांना Betterment form भरण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. तरी दुसऱ्या प्रवेश यादीतील विद्यार्थ्यांनी दि.२७.१०.२०२५ पासून दि.२८.१०.२०२५ रात्री १२.०० वाजेपर्यंत Betterment form भरण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. तद्नंतर सुधारित तिसरी प्रवेश यादी लवकरच संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच सुधारित वेळापत्रक लवकरच संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

१. दुसऱ्या प्रवेश यादीतील ज्या विद्यार्थ्यांना प्रथम पसंतीक्रम मिळाला होता, परंतू त्या विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष संस्थेत जाऊन प्रवेश घेतला नाही, अशा विद्यार्थ्यांना Betterment form भरण्याची संधी उपलब्ध होणार नाही. परंतू असे विद्यार्थी Spot Round करिता पात्र राहतील.

२.तिसऱ्या प्रवेश यादीनंतर रिक्त राहिलेल्या जागा Spot Round ने भरण्यात येतील. याकरिता महिला उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल. तसेच महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास गुणवत्ता व जातप्रवर्गानूसार प्रवेश देण्यात येतील.

**सही/-**
**(डॉ. भावना पाटोळे )**
**संचालक,राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था,मुंबई**
**तथा समन्वयक, एकत्रित सामायिक प्रवेश परीक्षा**